महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : managerpom@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.०९/**१९५६७** **दिनांक: २५.०७.२०२२**

**प्रति,** **ई -मेल द्वारे**

**सर्व मुख्य अभियंता**
**म.रा.वि.वि.कं.मर्या.**
**परिमंडळ कार्यालय,**

**विषय: कंपनीतील उपकेंद्र सहाय्यक पदी कार्यरत असलेल्या पुरुष व महीला कर्मचाऱ्यांना गणवेष देण्याबाबत.**

म.रा.वि.वि.कंपनी मर्या. मधील कार्यरत तारमार्ग कर्मचाऱ्यांना संहिताबध्द आदेश क्र.१ दि.१३.१०.१९७२ मधील तरतुदीनुसार खाकी रंगाचे कापड तांत्रिक संवर्गातील वेतनगट ३ व ४ मधील कर्मचारी यांचे करीता गणवेष हा दर दोन वर्षानी एकदा पुरविण्यात येतो. तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र.३५० दि.३१.०५.२००० अन्वये सदर बाबतीत वेतनगट ३ व ४ मधील सर्व तांत्रिक कर्मचाऱ्यांना गणवेषाच्या पॅटर्नबाबत व खरेदीबाबात सविस्तर सुचना यापूर्वीच निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत.

२. तद्नंतर कंपनीतील कनिष्ठ तंत्रज्ञ तसेच यंत्रचालक ही पदे भरण्याची पध्दत सन २०१२ पासुन बदलण्यात आली असुन कनिष्ठ तंत्रज्ञ या पदाकरीता प्रथम ३ वर्षाच्या कंत्राटी कालावधीमध्ये **'विद्युत सहाय्यक'** हे पद तयार करण्यात आले आहे. तसेच २०१४ पासुन यंत्रचालक या पदाकरीता प्रथमत: ३ वर्षाकरीता **'उपकेंद्र सहाय्यक'** हे पद निर्माण करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने कंपनी अंतर्गत रुजू होणाऱ्या सर्व पुरुष व महिला **'विद्युत सहाय्यक'** पदावरील कर्मचाऱ्यांकरीता कंपनीचे प्रशासकीय परिपत्रक क्र.४६१ दि.०६.०७.२०१३ अन्वये सुधारित गणवेष देण्याबाबतची तरतुद करण्यात आली आहे.

३. परंतु काही परिमंडळा मार्फत कंपनीतील **'उपकेंद्र सहाय्यक' या** पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना कंपनीचा गणवेष देण्याबाबत मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सक्षम अधिकाऱ्यांच्या मंजुरीनुसार असे निर्देशित करण्यात येत आहे की, म.रा.वि.मं. प्रशासकीय परिपत्रक क्र.३५० दि.३१.०३.२००० अन्वये **मुद्दा क्र.'घ'** नुसार कंपनीतील वेतनगट ३ व ४ मधील सर्व तांत्रिक कर्मचाऱ्यांना गणवेष पुरविण्याबाबतच्या सुचना यापूर्वीच निर्गमित केल्या आहेत. त्याचधर्तीवर कंपनीतील सद्यस्थितीत कार्यरत यंत्रचालक संवर्गातील ३ वर्ष कंत्राटी कालावधी मधील सर्व पुरुष किंवा महिला **'उपकेंद्र सहाय्यक'** या पदी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचारी यांना कंपनीचा गणवेष पुरविण्यात यावा.

**(अ.म.भादीकर)**
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**
संचालक (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना:**
१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**
१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.